



* 'मेघदूत' काव्यातील पंचसंवेदना *
॥मेघदूतम॥
आषाढाच्या पहिल्या दिवशी
बघतो, शिखरी मेघ वाकला,
टक्कर देण्या तटभिंतीवर
क्रीडातुर, गज जणू ठाकला!!
अनुवाद: श्री. बा. भ. बोरकर

PAGE NO.: 1
DATE.: / / 2024

॥श्री॥

# 'मेघदूतम्'

## *मेघदूतातील पंचसंवेदना*

दरवर्षीप्रमाणे यंदा ६ जुलै २०२४ ला 'आषाढाचा प्रथम दिवस' महाकवि कालिदास यांच्या स्मृतिदिन म्हणून साजरा केला. त्यानिमित्ताने अभ्यासिलेले 'मेघदूतम्' या काव्याचा पुनश्च काव्यरसास्वाद घेतला.

'मेघदूतम्' हे कालिदासांनी रचलेले संस्कृत मधील अत्युत्कृष्ट खण्डकाव्य आहे. त्यातील उत्कृष्ट कविकल्पना, भाषासौष्ठव, मानवी स्वभाव व निसर्गसौंदर्याच्या यथातथ्य वर्णनांमुळे व पोषक गेय 'मन्दाक्रान्ता' वृत्तामुळे हे खण्डकाव्य जगप्रसिद्ध, लोकप्रिय व सरस ठरले आहे.

मेघदूत काव्याचे संविधानक अगदी साधे व सुबोध आहे.

अलकानगरीतील एका यक्षाद्वारे नियोजित कर्तव्यात पत्नीप्रेमामुळे प्रमाद घडतो. त्याची शिक्षा म्हणून 'कुबेर राजा' यक्षाला एक वर्ष पत्नीपासुन दूर जाण्याची आज्ञा देतो. यक्ष रामगिरिपर्वतावर वास्तव्यास असतांना ७-८ महिन्यांच्या पत्नीविरह तो सहन करतो. तशातच वर्षाऋतूचे आगमन होते. दिर्घविरहाने, त्यातच वर्षाऋतुच्या आगमनाने विरहव्यथा पराकोटीला गेलेली आपली पत्नी आपल्या-सारखीच कृश झाली असेल, आपले क्षेमकुशल न कळल्यामुळे दुःखी असेल या जाणीवेतून यक्ष पत्नीस संदेश देण्यासाठी 'दूत' धाडावा असा विचार करतो. त्याचक्षणी यक्षास वर्षेचे (पावसाचे) आगमन वृत्त देणारा 'मेघ' आकाशात दिसतो.

जगाचा ताप हरून समृद्धी देणारा, मनोहर, नील वर्णाने सर्वांना मोहित करणारा, विशेषतः

Amar KRISH

Teacher's Signature

PAGE NO.: 2
DATE: / / 2024

उत्कंठितांच्या हृदयास आल्हाद देणारा 'मेघ' दूत म्हणून पाठवावा असा निश्चय करून, यक्ष मेघाशी संवाद साधतो. मेघ अचेतन आहे, त्याच्याकडून असे कार्य घडेल ? ही कल्पनाही यक्षाच्या मनात आली नाही. रामगिरीवरून थेट अलकानगरीपर्यंतचा मार्ग यक्षाने मेघास सांगितला.

अचेतनाला चेतनत्व देऊन त्याद्वारे संदेश (पाठविण्याचे) वहनाचे कार्य करवून घेणे, ही कवीकल्पना लोकोत्तर चमत्कारच आहे.

हे काव्य, ही कल्पनारम्यता, सहृदयांना अत्युच्च आल्हादकारकत्त्वाचा आनंद देते.

वाचक रसिक सुद्धा काव्यरसास्वाद घेतांना भान हरपून विसरून जातात की मेघ अचेतन आहे. हेच मेघदूताचे काव्यसौंदर्य आहे

पंचसंवेदना- रसिकांच्या पंचज्ञानेंद्रियांना तृप्त करणारे भाव प्रदान करण्याची अद्‌भुतरम्यता ही 'मेघदूताची' महानता आहे.

"स्वाभाविकपणाची कक्षा न ओलांडता कल्पनेच्या भराऱ्या, निरनिराळ्या मनोविकारांचे पालक पापुद्रे मोठ्या कौशल्याने उकलून शब्द आणि अर्थ याद्वारे वाचकांच्या समोर जणू प्रत्यक्ष घटनाचित्र उभे करून, रसिकांच्या संवेदनांना जागृत करून प्रत्येक प्रसंग हृदयस्पर्शी करून कालिदासाने या काव्यास अजरामर केले."

मेघदूतातील संवेदनांवर आधारलेली प्रतिभाने सगळ्या शास्त्रांच्या पलिकडे जाऊन, काव्यातील ही मनोज्ञ कल्पनाचित्रे मानवी संवेदनांना हळुवारपणे उमलवते. अत्युच्च शालिनता, मृदुत्व, मधुरता, संपन्नता याद्वारे मानवी भावनांना उत्तुंग, अमर्याद आल्हादकतेचे ऐश्वर्य प्रदान करून देते.

या काव्यातील प्रत्येकच श्लोकात चित्रकारांना चित्रविषय सापडतात, ते याच संवेदनांच्या अनुभवामुळे.

Amar KRISH

Teacher's Signature

पहा महाकवि कालिदास विविध संवेदना कशा उधळतात ते, 'जणू 'मेघदूत' पंचतारांकित काव्याकाश !!!!!

दृक संवेदना - मेघा ला त्याचा मार्ग वर्णन करतांना कवि कालिदास म्हणतात

" हे मेघा, वायूमार्गावर आरूढ झालेल्या तुला आकाशात पाहून विश्वासाने वाटसरूंच्या प्रेमिका (ज्यांचे पति परदेशी आहेत) केसांच्या बटा दूर करुन तुला मोठ्या आशेने पाहतील कारण आकाशात मेघ दिसताच या प्रेमिकांचे पतिही परत येतील."

पुढे नगरे, पर्वत, नद्या यांचे वर्णन करतांना कालिदास सांगतात. " खालवर बिळा असलेल्या विंध्य पर्वताच्या पायथ्याला पसरलेली 'रेवा' नदी गजराजांच्या अंगावर काढलेल्या वेलबुट्टीप्रमाणे तुला दिसेल. हे कल्पनाचित्र अतिशय सुंदर आहे. काळ्या दगडावर आपटणाऱ्या नर्मदेच्या (रेवा नदी) प्रवाहाच्या अनेक धारा होतात. त्या इतस्ततः धावू लागतात. खूप उंचावरुन पाहिले तर विच्छिन्न झालेल्या प्रवाहाच्या धारांचे दृश्य मोठे मनोज्ञ दिसेल. एखाद्या प्रचंड हत्तीच्या श्यामल शरीरावर पांढऱ्या रंगाची वेलबुट्टी काढल्याचा भास होईल.

संध्याकालिन सूर्याच्या आरक्त प्रभेने रंगलेला 'मेघ' नुकत्याच उमललेल्या जास्वंदीच्या गर्द तांबड्या फुलाप्रमाणे दिसेल, आणि त्यामुळे रक्ताचे थेंब ज्यातून निथळत आहेत, असे आर्द्र गजाजिनं शंकराने हातात धरल्याचा भास होईल.

हे मेघा, तू दशार्ण प्रदेशात पोचलास की हा दशार्ण प्रदेश (दशार्ण म्हणजे दहा नद्यांचा प्रदेश) टोके उमललेल्या केवड्यांद्वारे बगीचे कुंपण पांढुरके झालेला, कावळे व इतर पक्ष्यांनी घरटी बांधल्याने गावाच्या सीमेजवळील वृक्ष गजबजलेल्या, पिकल्याने काळसर झालेल्या जांभळीच्या वनांच्या काही दिवसांनी हंसांचे निवासस्थान होईल कारण तेथे तुझे आगमन झाले असेल.

पुढचा मार्ग सांगतांना यक्ष मेघाला सांगतो. जरा वाट वाकडी करून उत्तरेला प्रयाण करण्याआधी पृथ्वीवरील

स्वर्गाच्या तुकडा असलेल्या उज्जयिनी नगरीस तू अवश्य जा. उज्जयिनीचे वैभव असणारा सिप्रेचा वारा तिथे भ्रमण करतो. सोबत कमळाच्या सुगंधाला आणतो. सारसांच्या प्रणय धुंद कूजनाला घुमवितो आणि महालांच्या गच्चीवर मल्यापहाटे सुंदरींची ग्लानी हा क्षिप्रावात कमी करतो. काय यथार्थ वर्णन नदीवरून येणाऱ्या पहाट वाऱ्याचे.

— यानंतर कवींनी केलेले अलकानगरीचे वर्णन इतके समर्पक शब्दात साकारते की अलकानगरी त्या दिशेलाही न गेलेला माणूस सहजच तेथे पोचेल

— पण तत्पूर्वी उज्जयिनीच्या बाजाराचे वैभव सांगतांना कालिदास सांगतात, या येथे रत्नांचे, माणकांचे, मोत्यांचे आणि पोवळ्यांचे ढिगच्या ढिग असे काही रचले आहेत की त्यांच्याकडे पाहून वाटावे आता रत्नाकरात (समुद्रात) पाणीच तेवढे शिल्लक असणार.

— त्या काळातील कालिदासाने वर्णिलेल्या अलकानगरी चे दृश्यचित्र रसिक सहज बघू शकतो. महाकवी सांगतात त्या अलकानगरीत सुंदर स्त्रियांनी गजबजलेले, म्हणजेच विद्युल्लतेच्या प्रभेला लाजवतील अशा सौंदर्य शालिनी आहेत. इंद्रधनुष्य फिके पडावे अशी चित्रकारी असलेले, संगीतासक्त मृदंग वाजत असणारे, रत्नजडित भूमी असलेले, गगनचुंबी मेघचुंबी असलेले राजमहाल आहेत.

बाराही महिने फुलांनी बहरलेले वृक्ष, त्यावरील भ्रमरांचा धुंद गुंजारव. सरोवरात प्रफुल्लित बारमाही कमलपुष्पे, त्याभोवती फिरणारे हंस, वाड्यातील मोर पिसारा कायम तेजस्वी असणारे. आणि नेहमी चांदण्यांनी युक्त असलेल्या रात्री अंधःकार दूर केल्याने आल्हाददायक अशी ही अलकानगरी !!

यानंतर कवि कालिदास 'मेघाला' अलकानगरी तील स्वगृहाचे वर्णन करताना व घराची ओळख करून देतांना सांगतो......

त्या अलकानगरीत कुबेराच्या महालाच्या उत्तरेस इंद्रधनुष्याप्रमाणे सुंदर असणाऱ्या तोरणाने लांबूनही आमचे घर लक्षात येते.

Amar KRISH Teacher's Signature

PAGE NO.: ५
DATE.: / / 2024

घरासमोरच माझ्या पत्नीने पुत्रवत् जोपासलेला, वाढवलेला, पुष्पगुच्छ हातात येण्याइतपत वाकलेला लहानसा मंदार वृक्ष आहे. त्या घरात, पाचूच्या शिळांनी पायऱ्या बांधलेली, सुवर्ण कमळांनी भरलेली पुष्करिणी (विहिर) आहे. जिच्या जलात हंसक्रिडा सुरु असते. त्या विहिरीच्या काठावर सुंदर इंद्रनील मण्यांचे शिखर तयार केलेला, सुवर्ण कर्दळीच्या कुंपणाने प्रेक्षणीय क्रीडापर्वत आहे. या क्रीडापर्वताजवळ कोरांटीच्या कुंपणाने वेष्टित मेगऱ्याच्या मंडपाच्या जवळ असलेले, थरथरत्या कोवळ्या पालवीचा तांबडा अशोक आणि सुंदर बकुळवृक्ष आहेत.

- दृक् संवेदनांवर आधारलेली मनोज्ञ कल्पनाचित्रे पाहतांना त्यातील रंगसौंदर्यही तितकेच मनोहारी चित्रित केले आहे. ही रंगसंगती कवीच्या सौंदर्यग्रहणाची व चित्रणाची प्रचिती देतात.
- "उसळी मारणाऱ्या पांढऱ्याशुभ्र माशांची पांढरी उदरे चमकतात आणि त्यामुळे विलासिनींच्या चंचल कटाक्षांची आठवण होते." असे कवी वर्णन करतात.
- रक्ताशोकाच्या पालवीचा पांढरा रंग, तांबडा (लालसर) रंग, बकुळीच्या फुलांच्या पिवळसर पांढरा रंग, कुरबकाच्या (कोरांटीच्या) फुलांच्या तांबडा, पिवळा रंग, जाईच्या फुलांचा शुभ्रवर्ण ही रंगसंगती डोळ्यांना आल्हादकता देते.

अशी नेत्रसुख देणारी कित्येक दृश्ये मेघदूतात दृष्टीस पडतात. दृक्संवेदनांवर आधारित त्यातील रंगसौंदर्याने जणू निसर्गचित्रच आपल्यासमोर साकारते. ही काव्यक्षमता इतकी दिव्य आहे की कोऱ्या पडद्यावर चित्रपट दिसावा.

श्रवण संवेदना - कवी कालिदासांनी अगणित दृश्ये साकारली आणि श्रवण संवेदनेद्वारे त्या दृश्यांना पार्श्वसंगीतही प्रदान केले. 'मेघ' आपणास मेघदूतात भेटतो तो त्याच्या फक्त गडगडाटासह नव्हे तर कधी श्रवणसुभग, कधी कर्णकर्कश, कधी घंटानादासह. कधी मृदंग वादन करणारा, तर कधी हळुवार हाका मारणारा. कधी दरीत घुमेल तर कधी गुहेत निनादेल.

Amar KRISH

Teacher's Signature

या काव्यात बलाकांच्या ध्वनी आहे. हंसाच्या ध्वनी, मोराची केकारव तर चातकांची हाक आहे. चक्रवाकाचे विरहगीत ही आहे. वेळुवनातील वेणुनाद, ललनांची गीते आहेत. महाकालाची आरती श्रवण संवेदनेला तृप्त करते. वीणा मृदंगाबरोबर संगीतशास्त्रीय मूर्छनांचाही उल्लेख आहे. पाणी पितांना हत्तीच्या नादाचा विचार आहे. असंख्य ध्वनिप्रकार उल्लेखांनी 'मेघदूत' भिजले तरी त्यातील हे नाद, ध्वनि, स्वर, संगीत कानात रुंजी घालतात. हे ध्वनि मेघदूताची क्षमता स्थाने आहेत.

उत्तरमेघातील एका श्लोकात स्वप्नातील (यक्षाच्या) पूर्वीचे प्रसंग सांगतांना ही इतके श्रवणीय कथन केले आहेत की वाचल्यानंतर रसिकांच्या श्रवणसंवेदना जागृत होऊन प्रत्यक्ष संवाद घडत आहे असे वाटते. मेघाने यक्षपत्नीस सांगितलेला निरोप ऐकतांना ही रसिक वाचक सुखावून जातो, कारण 'मेघ' यक्षपत्नीपर्यंत पोचल्याच्या आनंदात तो निरोप ऐकणे ही वाचकांसाठी श्रवण पर्वणीच आहे श्रवणानंद आहे.

स्पर्श संवेदना - महाकवींची स्पर्श संवेदनाविषयक वर्णने इतकी उत्कट आहेत की विदर्भाच्या उन्हाळ्यातही यक्षासह तुम्हा आम्हालाही ते हिमालयीन बोचऱ्या थंडीची लहर जाणवून देतील.

मेघातून स्रवणाऱ्या जलधारांचा शिडकावा होताच "नीचैर्गिरी" जणू पुलकित होऊन थरारून उठेल. वर्षाकाळाच्या प्रारंभी (प्रभातकाळी) उमलणारी तेजस्वी कदंब कुसुमे हे जणू त्या पर्वताचे रोमांच! वननदी तीरावरील बागांमधील जुईच्या कळ्यांवर जलबिंदुंचे सिंचन होईल. गन्धवतीच्या काठावरील उद्यानांना वारा थरारून सोडेल. प्रभातकाळी कमलिनींच्या कमलवदनावरील दवबिंदुरूपी अश्रू सूर्य आपल्या बोटांनी पुसतो. स्कंदावर हा मेघ आकाश गंगाजलाने सिंचित पुष्पांचा वर्षाव करेल. गारांच्या वर्षावाने हे मेघा,

Amar KRISH
Teacher's Signature

PAGE NO.: ६
DATE.: / / 2024

शरभांच्या कळपांना तू पिटाळून लाव. कैलासावर मेघ रेशमाप्रमाणे सुकुमार कल्पवृक्षाची पालवी थरारून सोडतो. चंद्राच्या प्रकाशा-मुळे मेघाचे टपोरे जलबिन्दु - चंद्रकान्त मण्यासारखे असणारे. स्त्रियांची ग्लानि नाहिशी करतात. अलकेतील उंच वाड्यांच्या गच्चीवर गेलेला मेघ जलकणिकांनी उंची चित्रांचा रंग खराब करतो. कडक थंडीने मलुल झालेली कमलिनीची दुरावस्था कवीच्या नजरेतून सुटली नाही. काव्यातून कधी केळीच्या गाभ्याची स रसरशित जाणवेल, कधी प्रभातीच्या कुंदांची शिथिलता, कधी उष्ण उसासे तर कधी आननस्पर्श! अशा असंख्य स्पर्शांची अशरिरी संवेदना आपणाला देण्याचे कौशल्य कविप्रतिभेला लाभलेले आहे. आननस्पर्श आणि आलिंगनाचे उत्कट, समरसतापूर्ण वर्णन हा स्वतंत्र विषय ठरेल. ह्या स्पर्शसंवेदना व्यक्त होतांना कुठेही असंयमित (संभोग) पिचारात वाचक जात नाही, इतक्या या स्पर्शसंवेदना उच्चप्रतीच्या आहेत. काही पद्यरचना स्पर्श संवेदनांच्या परमोच्च आनंद दर्शविणाऱ्या आहेत. गाढ आलिंगनातील उत्कट समरसतेचा प्रकर्ष अतिशय प्रभावीपणे एका श्लोकात आला आहे. अलकेवरून वहात आलेला वारा प्रियेच्या शरीराला स्पर्श करून आला असेल या कल्पनेने त्या वाऱ्याला दृढ आलिंगन देण्यास यक्ष उतावीळ झाला आहे.

घ्राण संवेदना - प्रथम तिन संवेदनांवर आधारलेल्या प्रतिमांच्या मानाने घ्राणसंवेदनांवर आधारलेली प्रतिमाने कमी आहेत पण वाचता वाचता वाचक त्या सुगंधांना जाणवून प्रसन्नता, आल्हादकता अनुभवतो.

नांगरट झालेल्या जमिनीवर प्रथम पर्जन्यवृष्टीने दरवळणारा मृदगंध, रानहत्तींच्या गंडस्थलातून प्रसवणाऱ्या मदाचा गंध, भाजलेल्या वा पोळलेल्या (वणव्यांनी) जमिनीचा वास, युवतींच्या जलक्रिडेवेळी उटण्याने सुगंधित जलाच्या व त्यावरून येणाऱ्या वाऱ्याचा गंध, गिरिकंदरात वेश्यांच्या नाभीने पाषाणांना प्राप्त कस्तुरीगंध अशा असंख्य


Amar KRISH
Teacher's Signature

PAGE NO.: ८
DATE.: / / 2024

सुवासांची दरवळ मेघदूतात प्रत्येक स्थळी भेटते. या सोबतीला कमल, कदम्ब, मंदार, ककुभ, कुटज, जाई, जुई जास्वंदी, केतकी, कुन्द, बकुळ, कुरबक, लोध्र, नीप, शिरीष अशी असंख्य पुष्पे, ज्यांच्या सुवासाने 'मेघदूत' डोळे व कानांसोबत नासिकेतही चिरंतन स्थान प्राप्त करते.

रससंवेदना - रससंवेदनांमध्ये जलप्राशनाची वर्णने. जवळपास सर्वच नद्यांवर जलप्राशन येते. ऐरावताच्या जलप्राशनाचाही उल्लेख एका श्लोकात आढळतो. हंसाच्या बिसदेरीचा व भ्रमरांच्या मधुप्राशनाच्या संदर्भ आहे. ललनांच्या मद्यप्राशनाचा ही उल्लेख यात आढळतो

या पाचही संवेदनांवर आधारित वर्णनांची मुक्त उधळण, 'मेघदूत' या काव्यास हजारो वर्षांनंतरही आजही रसिकांना भुरळ पाडते. रसिकांच्या रोमरोमात भिनलेले हे काव्य अजरामर ठरलेले आहे.





सौ. सुषमा द. गोखले
नागपूर - ९५५२८०८५६४